गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ६२ वा | शुक्रवार १९ जुलै २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 62 | Date : 19/07/2024 | blow Friday | Page 4 Price 4

# योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लाभार्थ्यांच्या याद्या युद्धपातळीवर तयार करा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : अर्थसंकल्पात समाविष्ट आणि महत्वाकांक्षी म्हणून जाहीर केलेल्या सात योजनांचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी जिल्हास्तरावर प्रत्येक योजनेसाठी समन्वय अधिकारी नियुक्त करा. या योजनांचा दर आठवड्याला आढावा घेण्यात येईल. त्यासाठी लाभार्थ्यांच्या याद्या युद्धपातळीवर तयार करण्यात याव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले. 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' कार्यक्रमासाठी शासकीय तसेच विविध प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे आदी विभागांनी तातडीने अशा पात्र उमेदवारांची नोंदणी करून, त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार या योजनेत सामावून घ्यावे, जेणेकरून मोठ्या संख्येने उमेदवारांना या योजनेतील विद्यावेतन देणे शक्य होईल, असे विशेष निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विविध महत्त्वाकांक्षी योजनांबाबत आढावा बैठक झाली. वर्षा शासकीय निवासस्थानी झालेल्या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार, मुख्यमंत्री सचिवालयाचे प्रधान सल्लागार मनोज सौनिक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह आदी उपस्थित होते. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे या दृकश्राव्य माध्यमातून उपस्थित होत्या. तसेच | पान २ वर



## पंढरपूर नगरीत शासनाचे चित्ररथ आकर्षणाचा केंद्रबिंदू



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी वारीच्या निमित्तानं, श्रीपांडुरंगाच्या भेटीसाठी, लाखो वारकरी, श्रीक्षेत्र पंढरपुरकडे चालले आहेत. आषाढीवारीला गौरवशाली आध्यात्मिक, सांस्कृतिक परंपरा आहे. सर्वांना एकता-समता-बंधुतेची शिकवण देणारी आषाढीवारी हे आपले वैभव आहे. या आषाढीवारीत आता शासनदेखील सहभागी होवून लोकांना योजनाची माहिती देत आहे. यंदा वारीत राज्यशासनाच्या दोन चित्र रथांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. वारी पंढरीची.. दिंडी अपत्ती व्यवस्थापनाची नावाचा चित्ररथ आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या मार्फत वारीत राज्यशासन कडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची जनजागृती करीत आहे. या चित्ररथाच्या माध्यमांतून कोणत्याही संकटकाळात राज्य शासन प्रत्येक नागरिकाच्या पाठीशी सदैव मदतीसाठी उभे असते. नैसर्गिक आपत्ती असो अथवा मानवनिर्मित आपत्ती असो याचा मुकाबला करण्यासाठी आपत्तीपूर्व माहिती असेल तर प्रत्येक जण आपत्तीला खंबीरपणे तोंड देवू शकतो. याचीच माहिती सर्वांना होण्यासाठी राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागा मार्फत | पान २ वर

## 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' उपक्रमातून १3 लाखांहून अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा

**सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पालखी मार्ग आणि पंढरपूर येथे पुरविण्यात आलेली सेवा**

*** प्रत्येक ५ किमी अंतरावर 'आपला दवाखाना'– २५८ * वारी दरम्यान १०२ व १०८ रुग्णवाहिका २४ बाय ७ उपलब्ध – ७०७ * दिंडी प्रमुखांसाठी औषधी कीट – ५८८५ * महिला वारकऱ्यांसाठी स्त्री रोग तज्ज्ञ – १३६ * पालखी मुक्कामाच्या ठिकाणी हिरकणी कक्षाची स्थापना –१३६ * पालखी मार्गावर आरोग्य दूत –२१२ * पालखी सोबत माहिती, शिक्षण व संदेशवहन चित्ररथ – ९ * पालखी मुक्कामाच्या ठिकाणी ५ खाटांची क्षमता असलेले अतिदक्षता कक्ष – ८७ * आरोग्य शिक्षण संवाद आरोग्य ज्ञानेश्र्वरी उपक्रम.**



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : आषाढी वारीनिमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरीच्या दिशेने निघालेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी आरोग्य विभाग 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' हा उपक्रम राबवीत आहे. या वारीमध्ये १७ जुलैपर्यंत १३ लाख ९६ हजार ७२ वारकऱ्यांवर मोफत उपचार करण्यात आले आहेत. आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांची संकल्पना आणि मार्गदर्शनाखाली हा विशेष उपक्रम सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने राबविण्यात आला. संत श्री ज्ञानेश्र्वर महाराज, श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून पंढरपूरला निघालेल्या संतांच्या पालख्या आणि राज्यातील सुमारे १ हजार दिंड्यांमध्ये सहभागी झालेले लाखो वारकरी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी आले. त्यांना रस्त्यात काही त्रास जाणवला तर लगेच उपचार मिळावेत, | पान २ वर

## आ.समाधान आवताडे यांच्या प्रयत्नाने राज्यातील पहिल्या मराठा समाज भवनाचा पंढरीत पायाभरणी शुभारंभ संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः मराठा समाजासाठी उभारण्यात येणारे राज्यातील पहिले मराठा भवन पंढरपूरमध्ये साकारण्यात येत असून या मराठा भवनाच्या मंजुरी पासून ते पायाभरणी शुभारंभ पर्यंत आमदार समाधान आवताडे यांनी सरकारची पाठ न सोडता पाठपुरावा केल्यामुळे पाच कोटी रुपये शासनाने मंजूर केले आहेत हा निधी कमी पडत असून आणखी दहा कोटी ची मागणी समाधान आवताडे यांनी सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने केली असून त्या निधीची तरतूद ही करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले आहे.२२ नोव्हेंबर २०२३ रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्तिकी एकादशीच्या पूजेसाठी पंढरपूर येथे आले असता सकल मराठा समाज पंढरपूर यांच्या वतीनेही देवेंद्र फडणवीस यांना मराठा भवनाचे निवेदन देण्यात आले होते त्याचबरोबर १५ डिसेंबर २०२३ रोजी



आमदार समाधान आवताडे यांनी रात्री बारा वाजता मराठा भवन व सारथीच्या केंद्र उभारणीची मागणी अधिवेशनामध्ये केली होती. २ फेब्रुवारी २०२४ रोजी गजानन महाराज मठाच्या पाठीमागील जागा मराठा भवनासाठी देण्यात यावी यासाठी पत्रव्यवहारही करण्यात आला होता त्याच बरोबर पालकमंत्री मा.श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी ही वेळी वेळी पाठ पुरावा केला त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी २७ जून २०२४ रोजी मराठा भवनासाठी निधी मंजूर केला असल्याचे घोषित केले त्यानुसार १७ जुलै रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मराठा भवनाचा पायाभरणी शुभारंभ करण्यात आला असून लवकरच हे भवन साकार होणार असल्याने मराठा बांधवांनी आ आवताडेंचे आभार मानले आहेत.

सदर प्रसंगी मर्चंट बँकेचे चेअरमन श्री.नागेश काका भोसले, मा.नगराध्यक्षा सौ साधना ताई भोसले,श्री.दिपक दादा वाडदेकर,श्री.महेश साठे,श्री.महेश डोंगरे,श्री.अमरजीत पाटील, श्री.संतोष कवडे,श्री.अनिकेत देशमुख श्री.शंकर सूरवसे,श्री.भास्कर जगताप,श्री.सुमित शिंदे,श्री.संदीप आबा पाटील,श्री.शरद चव्हाण सर,श्री.बापूसाहेब कदम,आदी मान्यवर उपस्थित होते.

## प्रशासनाकडून दूध व दुग्धजन्य पदार्थात भेसळ करणाऱ्या वर कठोर कारवाई होणार

### भेसळ तपासण्यासाठी महसूल पथक तयार व तपासणी सुरुवात

**आषाढी वारीच्या पार्श्र्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाला पंढरपूर शहर व परिसरातील सर्व हॉटेल आस्थापना बेकरीस स्वीट मार्ट प्रसाद विकणारे दुकाने आदी ठिकाणी कोणत्याही प्रकारची भेसळ होऊ नये या अनुषंगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे तपासणीची कारवाई सुरू होती. गोपाळ काल्याला दूध व दुग्धजन्य पदार्थाचा प्रसाद आधी मोठ्या प्रमाणावर विक्री होत असते त्या अनुषंगाने दूध व दुग्धजन्य पदार्थांमध् भेसळ करणाऱ्या संबंधितावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकारी पंढरपूर यांना देण्यात आले आहेत. तरी दूध व दुग्धजन्य पदार्थ विकणाऱ्या व्यक्ती व स्थापना यांनी भेसळ करू नये.**

**–कुमार आशीर्वाद**
**जिल्हाधिकारी सोलापूर.**



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी एकादशीदिवशीला पंढरपूर येथे मोठया प्रमाणात यात्रा भरते. चालू वर्षी आषाढी यात्रा सोहळयाचा कालावधी दिनांक ०६ जुलै २०२४ ते २१ जुलै २०२४ आहे. आणि, आषाढी यात्रा सोहळ्याच्या कालावधीत लाखो भाविक श्री. विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला येतात. आषाढी एकादशी ते गोपाळकाल्यापर्यंत वारकरी पंढरपूर शहरात वास्तव्यास असतात. त्यावेळी त्याचे भोजनामध्ये प्रामुख्याने दूध व दुग्धजन्य पदार्थ, बासुंदी, खीर यांचा समावेश होतो. दूध हा विघटनशील अन्नपदार्थ असून तो लवकर खराब होवून विषबाधा होण्याची दाट शक्यता असते. भेसळयुक्त व विघटनशिल दूधाचे पदार्थ वारक-यांच्या भोजनात आल्याने विषबाधा होण्याची दाट शक्यता आहे. याकरीता वारक-यांच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने अन्नपदार्थ, दूध व दुग्धजन्य पदार्थ, खिचडी यांची नमुने तपासणी प्रशासनाकडून करणेची कार्यवाही चालू आहे. तथापि, दूध व दुग्धजन्य पदार्थ यांचेत भेसळ होण्याची घटना घडत असलेची बाब निदर्शनास आलेली आहे. दूध व दुग्धजन्य पदार्थाच्या भेसळीमुळे विषबाधा होवून वारक-यांच्या जिवीतास धोका निर्माण होण्याचे घटना घडू नये, यासाठी दूध व | पान २ वर

## आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांना महाविद्यालय स्तरावर उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत पुढील ३ महिन्यात अनेक उपक्रम हाती घेण्यात आले असून, विविध महाविद्यालयांकडून आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. राज्यातील १००० महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांची स्थापना करण्यात येणार असल्याचे कौशल्य विकास विभागाकडून सांगण्यात आले होते, परंतु आत्तापर्यंत १९५८ महाविद्यालयांनी याकरिता अर्ज दाखल




केले आहेत. या पार्श्र्वभूमीवर येणाऱ्या काळामध्ये अधिक महाविद्यालयांना या उपक्रमात सामावून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे, राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सांगितले आहे. आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रावर पुढील महिन्यापासून प्रशिक्षण कार्यक्रम देखील सुरु होणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीला सकारात्मक वातावरण निर्मिती होण्यासाठी तसेच, युवक-युवतींना महाविद्यालयांमध्येच कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना सुरु करण्यात आली आहे. राज्यातील १००० नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येत आहेत. याकरिता अर्ज देखील मागवण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात १००० पेक्षा अधिक महाविद्यालयांनी उत्स्फूर्तपणे अर्ज दाखल केले आहेत. ही बाब सकारात्मक असून, याकरिता विभागाने देखील पुढाकार घेतला आहे.

प्रत्येक कौशल्य विकास केंद्रात प्रतिवर्षी साधारण १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण राज्यात प्रतिवर्षी साधारण १,५०,००० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण मिळणार आहे. या योजनेसाठी शासनाने १५० कोटी रुपयांची | पान २ वर

# बार्टी तर्फे संविधान दिंडीचे विठ्ठल-रुक्माईच्या नगरीत समारोप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक, सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर यावर्षी ही संविधान दिंडी चे आयोजन करण्यात आले आहे.संत ज्ञानेश्र्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान आळंदी व देहू येथून होऊन राज्याच्या कानाकोपऱ्यातून भक्तगण सहभागी झाले होते.

पालखी सोहळ्यात ठिकठिकाणी बार्टीचा संविधान रथ मार्फत संविधाचा प्रचार-प्रसार करण्यात आला. पालखीच्या सोहळ्यात पहिला दिवस देहू आळंदी नगरीतील वातावरण पासून विठ्ठल रुक्माई च्या दर्शनापर्यंत भक्तिमय वातावरण झाले होते. अशा या भक्तीमय सोहळ्यात बार्टीमार्फत संविधान रथाचे भव्यदिव्य विठ्ठल रुक्माई च्या नगरीत संविधान दिंडीचे





समारोप मा.ना.डॉ. सुरेश भाऊ खाडे, कामगार मंत्री तथा पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. समारोप कार्यक्रमाच्या येथे मोठ्या प्रमाणात भक्तांचागण उपस्थित प्रसंगी मा.डॉ. सुरेश भाऊ खाडे यांनी संविधान दिंडीच्या उपक्रमाचे कौतुक करून बार्टी संस्थेचे धन्यवाद मानले संविधानाचे जागर होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विठ्ठल - रुक्माई च्या कृपेमुळे व आज येथे कामगार मंत्री म्हणून संविधानामुळे उभा आहे. मागील वर्षी देखील संविधान दिंडीस मी भेट दिली होती

आजच्या या कार्यक्रमाचे नियोजनाबद्दल बार्टीचे मी मनापासून धन्यवाद करतो व दर साल हे उपक्रम सुरू राहावे असे देखील सांगितले.

तसेच सोलापूर मतदारसंघाचे प्रणितीताई शिंदे, खासदार-सोलापूर यांनी देखील संविधान दिंडीच्या समारोप कार्यक्रमा येथे सदिच्छा भेट देऊन बार्टी संस्थेच्या संविधान दिंडीच्या उपक्रमास विशेष धन्यवाद देऊन संविधान हे आजच्या काळात किती महत्त्वाचे आहे तसेच संविधानामुळे आपले अधिकार व कर्तव्य प्रत्येक नागरिकास समजणे आवश्यक आहे. संविधानविषयक प्रबोधन करण्यासाठी संविधान रथ उपक्रमांची संकल्पना उत्कृष्ट आहे.

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग महाराष्ट्र शासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान दिंडीच्या माध्यमातून वारकरी बांधवांना भारतीय संविधानाची माहिती व्हावी. अशा या उपक्रमाचे मुख्य मार्गदर्शक श्री. सुनिल वारे, महासंचालक बार्टी तसेच निबंधक इंदिरा अस्वार, विभाग प्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण, प्रकल्प व्यवस्थापक नसरीन तांबोळी तसेच पुणे विभागीय प्रकल्प अधिकारी जागृती गायकवाड,श्रीमती प्रणिता कांबळे प्रकल्प अधिकारी सोलापूर, राहुल कवडे प्रकल्प अधिकारी पुणे व सर्व समतादूत यांच्या सर्वांच्या वतीने आणि सुनिल सर्वगोड रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महाराष्ट्र प्रदेश संघटन सचिव, आर.पी. कांबळे पंचशील मंडळ, एल.एस. सोनकांबळे, बी.एस.पी. प्राचार्य, राजेंद्र पाराधे, एड. किर्तीपाल सर्वगोड रि.पा.ई.शहराध्यक्ष, समाधान आठवले तालुका उपाध्यक्ष रि.पा.ई, योगेश जाधव रि.पा.ई. युवक पंढरपूर तालुकाध्यक्ष, अमित कसबे, राजेंद्र ढवळे, श्रीकांत कसबे तसेच सामाजिक कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून संविधान दिंडीच्या समारोप कार्यक्रमात सहकार्य केले. आळंदी ते पंढरपूर संविधान दिंडी आयोजित करून समारोप पंढरपूर नगरीत करण्यात आले.

# अक्कलकोट शहरात मोहरम शांततेत अति उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट शहरातील मोहरम निमित्त पंजे व ताबूत काढण्यात आलेल्या विसर्जन मिरवणुका अत्यंत शांततेत आणि अति उत्साहात व भक्तिमय वातावरणात काढण्यात आल्या.

अक्कलकोट शहरातील मौलाली गल्ली माणिक पेठ बुधवार पेठ खासबाग गल्ली आणि नाईकवाडी गल्ली येथून गल्ली येथून परंपरेनुसार पण जेवली काढण्यात आले.

पोलीस प्रशासनाने दिलेल्या नियमाचा पालन करून व वेळेचा पालन करून रात्री १०:०० वाजता संपूर्ण अक्कलकोट शहरातील पंजे मिरवणुका विसर्जन करण्यात आले.

यंदाच्या वर्षी अक्कलकोट शहरातील मोहरम कमिट्या कडून अनावश्यक खर्च टाळून आपापल्या मंडळातर्फे मोहरमच्या दहा दिवसांमध्ये विविध कार्यक्रम व प्रसाद (लंगर) ठेवण्यात आले होते.मोहरम निमित्त दर्शनासाठी व नैवेद्य घेऊन येणाऱ्या भाविकांनी या प्रसादाचा व लंगर चा लाभ घेतला.अक्कलकोट शहरातील मौलाली गेली येथे भाविकांसाठी मौलाली पंजे व सय्यद खाशीम पंजे तर्फे मौलाली गल्ली यंग कमिटी कडून तीन दिवस भक्तांसाठी सकाळी आणि रात्री दोन वेळेस प्रसाद (लंगर) ठेवण्यात आले होते.




अक्कलकोट शहरातील मुजावर गल्ली येथे बसवण्यात येणार १२५ ते १५० वर्षापासून बसविण्यात येणारे ताबूत (डोली) यंदाच्या वर्षी मोडीत काढण्यात आली.अक्कलकोट शहरातून मुजावर गल्लीने घेतलेल्या १२५ते १५० वर्षांपासून पारंपारिक पद्धतीने बसविण्यात येणाऱ्या डोली यावर्षी न बसवल्यामुळे अक्कलकोट शहरातील अनेक लोकांकडून व भक्तांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. अक्कलकोट शहरातून निघालेल्या पंजे व डोली मिरवणुकी पाहण्यासाठी आलेल्या भाविकांना अक्कलकोट शहरातील मौलाली गल्ली यंग कमिटी कडून(मौलाली गल्ली), व अशपाक भाई बळोरगी मित्र परिवाराच्या वतीने (मच्छी मार्केट), नगरसेवक सद्दाम शेरीकर परिवाराच्यावतीने (कारंजा चौक), व मुजावर गल्ली मित्र परिवाराच्या वतीने (सेंट्रल चौक) येथे ठीक ठिकाणी शरबत व मसाला दूध वाटप करण्यात आले.

नगरसेवक सद्दाम शेरीकर यांनी यंदाच्या वर्षी प्रथमच अक्कलकोट शहरात मोहरमचे औचित्य साधून अक्कलकोट शहरातील सर्व तरुणांना एकत्र करून एक लेझीम संघ तयार केला आणि संपूर्ण तरुणांना पंधरा ते वीस दिवस लेझीम सराव घेऊन तरुणांना लेझीम खेळण्यासाठी प्रोत्साहन केले आणि त्या प्रोत्साहनाला तरुणांनी कालच्या मिरवणुकीमध्ये शंभर टक्के प्रतिसादही दिला.

अक्कलकोट शहरातील मिरवणुका पाहण्यासाठी व नगरसेवक सद्दाम शेरीकर यांनी कारंजा चौक येथे ठेवण्यात आलेल्या शरबत वाटपचा कार्यक्रमाच्या उद्घाटन व शरबत वाटप साठी अक्कलकोट तालुक्यातील विविध मान्यवर स्टेजवर आले होते, प्रमुख मान्यवरांचा स्वागत व सत्कार नगरसेवक सद्दाम शेरीकर मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती माझी गृहराज्यमंत्री सिद्धाराम जी म्हेत्रे साहेब ,रमेश पाटील,महेश हिंडोळे,मल्लू पाटील,यशवंत धोंगडे,एपीआय निलेश बागव, सुरेश सूर्यवंशी, पत्रकार अल्ताफ पटेल,मिलन कल्याणशट्टी,अशपाक बळोरगी, अविनाश मडीखांबे,अतिश मोरे,मुत्तू खेडगी,आदी मान्यवर उपस्थित होते.

# संपादकीय

## वारकऱ्यांची अपेक्षा..

वारकऱ्यांना आता विठुरायाच्या दर्शनाची मनी ओढ लागली आहे. शेकडो किलोमीटर पायी आलेले वारकरी चंद्रभागेत स्नान करुन विठुरायाच्या दर्शनाने कृतकृत्य होतील. देशातील गरिबांचा एकमेव देव म्हणून विठ्ठलाकडे पाहिले जाते. या गरिबांच्या देवाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी संत ज्ञानेश्वर माउली, संत तुकाराम महाराज आदी संतांच्या पालखी सोहळ्यासमवेत पंढरीत दाखल होतात. सांसारिक जीवनातील अडचणी बाजूला सारून ऊन, वारा, पाऊस अंगावर झेलत वारकरी दरवर्षी न चुकता पंढरीची वारी करतात. दरवेळी पंढरीत येणाऱ्या भाविकांना येथे कोणतेच नावीन्य दिसत नाही. भाविकांची तीच अलोट गर्दी, अलीकडेच ५२ एकरांमध्ये उभारलेल्या राहुट्या, मंदिर परिसरात दाटीवाटीने थाटलेली पूजा साहित्यांची दालने यामध्ये वारकऱ्यांना तोच तोपणा जाणवतो. तरीही पंढरीतील कोणत्याही तक्रारींचा पाढा न वाचता सुमारे दोन हजारांपेक्षा अधिक मठांमध्ये टाळ-मृदंगांचा गजर आणि विठ्ठल नामाचा एकच जयघोष चालू असतो. विठ्ठलाप्रमाणेच त्यांचे भक्तही भोळे-भाबडे असल्यामुळेच अन्य तीर्थक्षेत्रांच्या तुलनेत राज्यकर्त्यांना पंढरीचा विकास करावासा वाटला नसेल. नाशिकमध्ये दर बारा वर्षांनी कुंभमेळा भरतो. तेथील सोयी-सुविधा, त्या तीर्थक्षेत्राचा झालेला विकास पाहाता दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरीतील या कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सुविधा अत्यंत तोकड्याच आहेत. १९९५ मध्ये राज्यात युतीची सत्ता असताना तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत मनोहर जोशी यांनी राज्य मंत्रिमंडळाची पंढरपुरात बैठक घेऊन विठुरायाच्या नगरीच्या विकासाची संकल्पना मांडली होती. परंतु, ते कागदावरच राहिले. त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. नमामी गंगेच्या धर्तीवर नमामी चंद्रभागेच्या विकासाची संकल्पना देवेंद्र फडणवीस यांनी मांडली होती. परंतु, ती योजनाही मार्गी लागू शकली नाही. तिरुपती बालाजी मंदिर या तीर्थक्षेत्राप्रमाणे पंढरीचा विकास करु, ही कल्पनाही फडणवीस यांनीच मांडली होती. त्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांचे पथकही तिरुपतीला पाठवले होते. त्यानंतर अलीकडेच विठ्ठल मंदिर कॉरीडॉरचा मुद्दा त्यांनी पुढे आणला. परंतु, जनतेला विश्वासात न घेता राबवत असलेली ही योजना आता बासनात गुंडाळून ठेवण्याची वेळ आली आहे. दरवर्षीच्या आषाढी यात्रेवर राज्य सरकारकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो.

पान १ वरुन

## आचार्य चाणक्य कौशल्य विकास..

तरतूद केली असून १५ ते ४५ वयोगटातील सर्व युवक-युवती पात्र आहेत. कालसुसंगत तंत्रज्ञानाचे कौशल्य प्रशिक्षण महाविद्यालयीन युवक युवतींना देऊन त्यांना रोजगारासाठी सक्षम बनवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. आपल्या कार्य क्षेत्रातील पात्र महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र निर्माण करण्यासाठी महाविद्यालयांना यापूर्वीच आवाहन करण्यात आले होते, याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. या योजनेद्वारे पुढील ३ वर्ष सहकार्य देण्यात येणार आहे. रोजगार मागणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे युवक घडावेत, यासाठी राज्य आणि केंद्र सरकार काम करत असल्याचे मत मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी यानिमित्ताने व्यक्त केले आहे.

## प्रशासनाकडून दूध व दुग्धजन्य

दुग्धजन्य पदार्थ यामध्ये भेसळ करणाऱ्यावर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) प्रतिबंधात्मक आदेश देण्यात येत असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.उपरोक्त संहिते अन्वये प्राप्त अधिकारानुसार पंढरपूर शहर व परिसरातील दूध व दुग्धजन्य पदार्थ, बेकरी पदार्थ, हॉटेलमधील अन्न पदार्थ यांची विक्री करणारे यांचेवर अन्न पदार्थात भेसळ करणे व अन्न विषबाधा उत्पन्न करण्यासारखी परिस्थिती उद्भवणे यास कारण ठरण्यास प्रतिबंध करीत आहेत. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्ती, आस्थापनावर अत्यंत कडक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

भेसळ तपासणी पथकाची कार्यवाही सुरू-

अन्न व औषध प्रशासनासह प्रांताधिकारी, तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली दूध दुग्धजन्य पदार्थ बेकरी पदार्थ हॉटेलमधील अन्नपदार्थ या ठिकाणची तपासणी करण्यासाठी महसूल पथकेही नेमण्यात आली असून स्वतः प्रांताधिकारी व तहसीलदार याची पाहणी करीत आहेत.

## पंढरपूर नगरीत शासनाचे चित्ररथ

आपत्ती विषयक माहिती देणारा जनजागृतीपर चित्ररथ हा संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात आषाढी वारीच्या निमित्ताने पुणे ते पंढरपूर असा सहभागी झाला आहे. या चित्ररथाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन या विभागातील योजनांची माहिती संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला काना-कोपऱ्यात पोहोचावी अशी माहिती मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल भाईदास पाटील यांनी दिली आहे.या चित्ररथाच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन विभाग यांचे कलापथक जनजागृतीचे काम करत आहे.

## ‘आरोग्याची वारी, पंढरीच्या

यासाठी आरोग्य विभागाने सलग दुसऱ्या वर्षी ‘आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी’ हा उपक्रम हाती घेतला होता. प्रत्येक ५ किलोमीटरवर एक ‘आपला दवाखाना’ तयार करण्यात आला होता. वारी दरम्यान ६ हजार ३६८ आरोग्य अधिकारी, कर्मचारी यांनी वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविल्या. तात्पुरत्या रुग्णालयात दाखल करून २,३२७ रुग्णांवर उपचार करण्यात आले. पालखी आणि दिंडी मुक्कामी असणाऱ्या ठिकाणी ५ खाटांचे तात्पुरते अतिदक्षता विभाग (आयसीयू) सज्ज ठेवण्यात आले होते. येथे ऑक्सिजन, मॉनिटर, औषधे यांच्यासह तज्ज्ञ डॉक्टरांची सुविधा उपलब्ध करण्यात आली होती.

या आषाढी वारीमध्ये डॉक्टर, नर्स, आरोग्य सहाय्यक, आशा, आरोग्य सेवक, शिपाई, सफाई कामगार अशा सर्व कर्मचाऱ्यांनी सेवा दिली. पालखी मार्गावर ताप, सर्दी, खोकला, ड्रेसिंग, जुलाबचा त्रास झाल्यास सेवेसाठी दुचाकी रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात आली होती. आषाढी वारीमध्ये पालखी मार्गावर गर्दी जास्त असल्याने प्रत्येक ठिकाणी मोठी रुग्णवाहिका फिरू शकत नाही. त्यासाठी दुचाकी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. फिरत्या रुग्णवाहिकेबरोबरच १०२ व १०८ या रुग्णवाहिकाही पालखी मार्गावर सेवा देत होत्या. तसेच पालखीमध्ये दिंडी प्रमुखांना आरोग्य कीट देण्यात आली होती. रुग्णवाहिकेबरोबरच महिलांसाठी प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची सोयही करण्यात आली होती.

## योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी

राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित क्षेत्रीय अधिकारी आदी दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले.

सुरवातीला मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने’च्या पोर्टलचे अनावरण करण्यात आले. https://rojgar.mahaswayam.gov.in या पोर्टलवर उमेदवारांना आणि उद्योग- व्यवसायांना, आस्थापनांना नोंदणी करता येणार आहे.बैठकीत ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ (महिला व बालविकास विभाग), ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना’ (कौशल्य विकास विभाग), ‘मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना’ (अन्न व नागरी पुरवठा विभाग), ‘मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना’ ( उच्च व तंत्र शिक्षण विभाग), ‘मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजना’ (सामाजिक न्याय विभाग), ‘मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना’ (ऊर्जा विभाग) आणि ‘मुख्यमंत्री वयोश्री योजना’ (सामाजिक न्याय विभाग) या योजनांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रभावी कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे निर्देश देताना म्हणाले की, या प्रत्येक योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर संबंधित विभागाच्या वरिष्ठाधिकाऱ्याला समन्वयक म्हणून जबाबदारी देण्यात यावी. जिल्हाधिकाऱ्यांनी आणि विभागीय आयुक्तांनीही या योजनांच्या प्रगतीचा, त्यातील नोंदणींचा दर आठवड्याला आढावा घ्यावा. जिल्ह्यांनी उद्दीष्ट निश्र्चित करावे. योजना राबवणाऱ्या संबधित विभागांनीही पुढाकाराने कार्यवाही करावी. लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहचवण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

‘मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने’त राज्यात ऑनलाईन पद्धतीने ५९ लाख तर ऑफलाईन पद्धतीने १५ लाख अर्ज दाखल झाल्याची माहिती देण्यात आली. एकाच दिवसात विक्रमी साडे सात लाख अर्ज आल्याची माहिती महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांनी दिली.

ही योजना गरीब महिलांना मोठा दिलासा देणारी असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत नोंदणी करताना कुठेही महिला-भगिनींची अडवणूक होता कामा नये. याकडे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी कटाक्षाने लक्ष ठेवावे. नोंदणी करतानाच्या अडचणी दूर कराव्यात. तसेच आलेल्या अर्जांची पात्रता निश्र्चित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. या योजनेची माहिती ग्रामपंचायत तसेच शहरातील वार्डा-वार्डापर्यंत पोहचली आहे. महिला भगिनींचा प्रतिसादही मोठा आहे. त्यांची नोंदणी करण्यासाठी आवश्यकता भासल्यास केंद्रांची संख्या वाढवण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. याशिवाय थेट लाभ बँकेत जमा होणार असल्याने महिलांचे आधार आणि बँक खात्यांची माहिती काळजीपूर्वक भरली जाईल याकडे लक्ष देण्याच्या सूचनाही केल्या.मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतही उद्योग विभागासह, प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमआयडीसी यासारख्या महामंडळासंह, सेवा क्षेत्रातील बँका-संस्था, सहकारी संस्था- कारखाने, दूधसंस्था अशा सर्वांकडून मागणी नोंद होईल, असे प्रयत्न व्हावेत. यातही प्रत्येक जिल्ह्याने प्रशिक्षणार्थी उमेदवारांचे उद्दीष्ट निश्र्चित करून, येत्या काळात प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि विद्यावेतन मिळेल यासाठी प्रय़त्न करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले.

मुलींना मोफत उच्च शिक्षण योजनेला गती देण्यात येत असल्याची माहिती मंत्री श्री. पाटील यांनी दिली. मुलींचे उच्च शिक्षण थांबू नये यासाठी महत्त्वाची आहे. त्यामुळे या योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नाही. संबंधित विभागांनी समन्वयाने या योजनेची अंमलबजावणी करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजनेत देशातील ७३ आणि राज्यातील ६८ तीर्थस्थळांचा समावेश आहे. त्यामध्ये मध्यप्रदेशातील महू हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मस्थळ, महाडचे चवदार तळे, भगवान बिरसा मुंडा यांचे झारखंडमधील रांची येथील स्थळ, नागपूरची दीक्षाभूमी यांचाही यात समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले. या योजनेतून राज्यातील जेष्ठांना लवकरात लवकर तीर्थयात्रा करता यावी, यासाठी नियोजन करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. वयोश्री योजनेतही राज्यात १९ हजार १३ अर्ज पात्र ठरले आहेत. या ज्येष्ठांना लवकरच त्यांच्या खात्यात लाभाची रक्कम देण्यात यावी. तसेच त्यासाठीचे नवीन पोर्टल लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात यावे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनाची त्वरेने कार्यवाही व्हावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी बैठकीत दिले. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनाही महिलांसाठी महत्त्वाची आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# ख्यातनाम गायक महेश काळे व सहकारी पुणे यांच्या सप्तसुरांच्या आविस्कारांनी सजलेली 'स्वर संध्या' ची मैफिल कार्यक्रम साजरी



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री गणेश वंदना..!, कृष्ण वासू देवाय..!, गुरु देवा..! रामकृष्ण हरी..!, माझी माऊली..!, माझे गुरुनाथा..!, आहे पुण्याईची..!, श्री स्वामी समर्थ..!, निरंकर हो..!, अशा एक ना अनेक मराठी भावगीते व भक्तीगीतांनी ख्यातनाम गायक महेश काळे व सहकारी पुणे यांच्या सप्तसुरांच्या आविस्कारांनी सजलेली ही 'स्वर संध्या' ची मैफिल रसिकांसाठी पर्वणीच ठरली.श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा उत्सवनिमित्त धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, गुरुवार दि. १८ जुलै रोजी सायंकाळी ७ वा. 'स्वर संध्या' सादरकर्ते – महेश काळे आणि सहकारी पुणे यांचा ह्या कार्यक्रमाने आठवे पुष्प संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन भाजपा जिल्हा उपाध्यक्ष मोहन डांगरे, सोलापूर शहरचे पोलीस उपाआयुक्त श्री व सौ. विजय कबाडे, श्री व सौ. ॲड. पी.बी.लोंढे-पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नातू व प्राभात चित्र मंदिराचे, उद्योगपती श्री व सौ. नीरज पाटील, सोलापूरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती मोनिकासिंह ठाकूर, सो.म.पा. उपायुक्त आशिष लोकरे, तहसीलदार विनायक मगर, पो.नि.राजेंद्र टाकणे, दिलीपभाऊ कोल्हे, स्थापत्य अभियंता राजेश निलवाणी, सराफ व्यापारी अभिनंदन गांधी, श्री शहाजी प्रशालेचे मुख्याध्यापक शिवाजीराव शिंदे, श्री स्वामी समर्थ हॉस्पिटलचे संचालक डॉ.विनायक बुधले, उद्योजक विलास कोरे, उद्योजक स्वामिनाथ हिप्परगी, स्थापत्य अभियंता अशोक येणगुरे, उद्योजक दिनेश पटेल, उद्योजक सिद्धेश्र्वर मोरे, उद्योजक काशिनाथ गोळ्ळे, योगेश डांगरे, गजानन पाटील, यांच्या हस्ते करण्यात आले.

**गुणवंत विद्यार्थी गौरव : तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.**

**शुक्रवार दि. १९ जुलै रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'भक्तिरंग' भक्तिगीते, भावगीते व नृत्य सादरकर्ते संस्कृती बालगुडे आणि सहकलाकार पुणे यांचा कार्यक्रम होणार आहे.**

दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते – ख्यातनाम गायक महेश काळे व सहकारी पुणे यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. नुकतेच महेश काळे यांना पुणे बालगंधर्व गुण गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल न्यासाकडून विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी न्यासाचे विश्र्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, अनुयाताई फुगे-पाटील, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, हिरकणी संस्थेच्या जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, संदीप फुगे-पाटील, राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले, लक्ष्मण पाटील, मनोज

**गुणीजन गौरव : नितीन चव्हाण – आदर्श सरपंच ग्राम पंचायत शावळ, सौ. सरोजताई तोळनुरे –परिचारिका प्राथमिक आरोग्य केंद्र शिरवळ, गौरीशंकर वाडीकर –प्रशिक्षण भूमापक भूमिअभिलेख अक्कलकोट, व्यापारी राजकुमार कोळी, योगेश जाधव पोलीस पाटील चिक्केहळ्ळी यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

निकम, अशोक उटगे, प्रा.शरणप्पा आचलेर, अरविंद शिंदे, ओंकारेश्र्वर उटगे, ॲड.संतोष खोबरे, राजु नवले, निखील पाटील, पिंटू दोडमनी, ओंकार माने, सुहास डोईफोडे, प्रा.प्रशांत शिंपी, जवहार जाजू, राजीव क्षीरसागर, शेखर फंड, विठ्ठल तेली, भरत राजेगावकर, स्वप्नील मोरे, प्रवीण घाडगे, गोटू माने, सौरभ मोरे, रोहित खोबरे, अतिश शिंदे, अतिश पवार, आकाश सुरवसे, अभिजित लोकापुरे, प्रितेश किलजे, गोविंद शिंदे, स्वामिनाथ गुरव, धनंजय गडदे, किरण पाटील, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, बिरप्पा व्हनजंडे, प्रसाद हुल्ले, ज्ञानेश्र्वर भोसले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्र्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.

# साखरखेड्र्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तथा सेवापूर्ती सोहळा

## विदर्भ न्याय चे आयोजन आ.डॉ.राजेंद्र शिंगणे सह डिवायएसपी मनिषा कदम यांची उपस्थिती





**दैनिक यशसिध्दि न्यूज**


बुलढाणा/राहुल साबळे :सालाबादाप्रमाणे यंदाही साखरखेर्डा येथील दहावी व बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व जिजामाता विद्यालयाचे शिक्षक रमेशराव दंदाले व सौ. शारदाताई दंदाले यांचा सपत्नीक सेवापूर्ती सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.आ.डॉ. राजेंद्रजी शिंगणे साहेब (माजी मंत्री म.रा.)कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सिध्दलिंग शिवाचार्य महाराज शिवाचार्य रत्न, पलसिध्द मठ साखरखेर्डा सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज मठाधिपती पलसिध्द मठ, साखरखेर्डा डिवायएसपी सौ मनिषा कदम, मा. कोमलताई झंवर, अध्यक्षा बुलडाणा अर्बन, माजी आमदार डॉ शशिकांत खेडेकर, सरपंच सौ सुमनताई जगताप, माजी सरपंच सौ पुनमताई पाटील, सौ संध्याताई जडे, स्वागताध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ बाळासाहेब गावंडे यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.यामध्ये दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व जिजामाता विद्यालयाचे शिक्षक रमेशराव दंदाले यांचा सेवापूर्ती सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दि २३ जुलै २०२४ ला जगद्गुरू पलसिध्द महास्वामी पिठाच्या सभागृहात सकाळी अकरा वाजता हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन विदर्भ न्यायचे कार्यकारी संपादक संतोष गाडेकर यांनी केले आहे.

# बाळ समुद्र गावात घाणीचे साम्राज्य गावकऱ्यांच्या आरोग्याकडे ग्रामपंचायततीचे दुर्लक्ष

## ग्रामपंचायत सदस्य साधना बोरकर व गावकऱ्यांची गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/ राहुल साबळे :सरपंच.सचिव यांच्या निष्क्रियतेमुळे गावात विविध समस्या निर्माण झाल्याने.नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून. बाळ समुद्र येथील गावकऱ्यांना पाहवयास मिळत आहे . पाणी पुरवठा जल कुंभाची साफ सफाई करण्यात आलेली नाही.लाखो रुपये खर्च करून बांधकाम झालेल्या नाली द्वारे कोणतेही घाणपाणी काढण्यात आलेले नाही.बांधण्यात आलेले शौच्छ खड्डे पुर्नत बोगस व निकृष्ट दर्जाचे असून.कोणतेही घाण पाणी जात नसल्याने घाण पाणी रस्त्यावर वाहत असल्याने नागरीकांच्या उलट समस्या वाढल्या आहेत, याचे ताजे उदाहरण समोर आले आहे बुलडाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा तालुक्यातील बाळ समुद्र या गावातील संपूर्ण रस्त्यांवर घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकडे ग्रामपंचायत प्रशासन मात्र पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याची तक्रार इथल्या ग्रामपंचायत सदस्य साधना बोरकर व गावकऱ्यांनी केली आहे. बाळ समुद्र ग्रामपंचायत असलेल्या या गावामध्ये मूलभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. ह्या सुविधा पुरवण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरत आहे. गावांमध्ये बहुतांश रस्त्यांचे बांधकाम झालेले नसल्याने गटारं देखील



बांधण्यात आलेली नाहीत. त्यामुळे गावातील संपूर्ण सांडपाणी रस्त्यावर सोडले जात आहे. तर काही नागरिकांनी सांडपाण्यासाठी असलेले शोषखड्डे देखील बुजवून घेतल्याने हे संपूर्ण सांडपाणी रस्त्यावर तुंबल्याने सर्वदूर गटारे साचली आहेत, असा आरोपही ग्रामपंचायत सदस्य साधना बोरकर व गावकऱ्यांनी केला आहे. या साचलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत आहे. सोबतच दुर्गंधीमुळे देखील नागरिक बेजार झाले आहेत. आधीच डेंग्यू ताप भीतीचे वातावरण झाले आहे, तर आता जिल्ह्यामध्ये डेंग्यू आणि मलेरियाचा प्रादुर्भाव होत असल्याने या घाणीचे साम्राज्या पसरल्याने गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.असा तक्रार अर्ज सुध्दा ग्रामपंचायत सदस्य साधना बोरकर व गावकऱ्यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती सिंदखेडराजा यांच्या कडे दिला आहे.

# प्रस्तावित अन्यायकारक व बेकायदेशीर बदल्याच्या विरोधात व इतर प्रलंबित मागन्यांसाठी विदर्भ पटवारी संघाचा बुलढाणा जिल्हा शासनाच्या विरोधात एल्गार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे : जिल्हा प्रशासनाने अवैध रेती उत्खनन व अवैध रेती साठा प्रकरणी महसूल, पोलीस व परिवहन या तिन्ही विभागातील अधकारी व कम्रचारी यांची सामुहीक जबाबदारी असताना देखील केवळ आणि केवळ तलाठी यांनाच जबाबदार धरण्याच्यां गैरसोईच्या ठिकाणी बदल्यांचा तसेच नियतकालीक बदल्यांसाठी पात्र तलाठी यांचे समुपदेशन न घेता अन्यायकारक व बेकायदेशीर बदल्यांचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांना पाठिवला आहे.

तसेच बर्याच कालावधी पासून प्रलंबित त मागन्यायावषयी जिल्हा प्रशासनाच्या उदासीन धोरणा मुळे तलाठी व मंडळ अधिकारी संवर्गामध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

या पार्शभूमीवर जिल्हा प्रशासनाच्या आठमुठे धोरणा विरोधात प्रस्तावित अन्यायकारक बदल्या रद्द करणे व इतर



प्रलंबित मागण्यासंदर्भात विदर्भ पटवारी संघ नागपूर, जिल्हा बुलढाणा यांनी मा.विजेंद्र कुमार धोंडगे जिल्हा अध्यक्ष यांच्या नेतृवात दि. १६.०७.२०२४ रोजी जिल्हा प्रशासनाला आंदोलनाची नोटीस दिली आहे. प्रस्तावित अन्यायकारक बदल्या रद्द करणे, विनंती व आपसी बदल्या करणे , जिल्हा स्तरावरील तलाठी आस्थापना रद्द करणे .,जुनी पेन्शन योजना लागूकरण्यात यावी,

नवीन लॅपटॉप व प्रिंटर विनाविलंब न करता देण्यात यावे प्रलंबित तलाठी कार्यालय भाडे, नायब तहसीलदार पदासाठी तलाठी /मं.अ.यांना खात्यांतर्गत विभागीय परीक्षा लागूकरावी या शिवाय इतर प्रलंबित आर्थिक व सेवा विषयक मागण्या पूर्ण न झाल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून दि.१८/०७/२०२४ रोजी काळ्या फिती लावून कामकाज करणे, दि. .२३/०७/२०२४ रोजी प्रत्येक तहसील कार्यालया समोर एक दिवशीय धरणे आंदोलन, दि २५/०७/२०२४ जिल्हाधिकारी कार्यालया समोर एक दिवशीय धरणे आंदोलन,२६/०७/२०२४ रोजी उ्डउ तहसील कार्यालयात जमा करणे व दिं.२९/०७/२०२४ सामुहीक रजा आंदोलन करणे अशी आंदोलनाची 'रूपरेषा ठरली आहे. सदर निवेदन देते वेळी विजेंद्र कुमार धोंडगे, जिल्हा अध्यक्ष विदर्भ पटवारी संघ , बुलढाणा सुर्यकांत सातपुते,जिल्हा अध्यक्ष मंडळ अधिकारी संघटना , बुलढाणा , अशोक शेळके , जिल्हा सचिव , मंडळ अधिकारी संघटना, बुलढाणा,विनोद भिसे , जिल्हा उपाध्यक्ष,वि प.स.बुलढाणा, शिवानंद वाकदकर , जिल्हा सचिव, वि.प.स.बुलढाणा , संजय डुकरे, जिल्हा सहसिचव , वि..प.स.बुलढाणा , संतोष राठोड , कोषाध्यक्ष , वि.प.स.बुलढाणा आनंद राजपूत .इतर आजी माजी पदाधिकारी व बहुसंख्य सभासद उपस्थित होते.

# विठू नामाचा गजराने दुमदुमले अवघे केंगाव परिसर

## रिंगण व पालखी विसावा कार्यक्रमाने लोक झाले भाऊक

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील विद्यालय केगांव यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीच्या निमित्ताने शालेय दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीहरी विठ्ठल रुक्मिणी च्या वेशभूषेत दिंडीमध्ये सहभागी झाले.अत्यंत प्रसन वातावरणात शाळेच्या परिसरात रिंगण सोहळा करत ज्ञानबा तुकारामाच्या विठ्ठलाच्या जय घोषात बाळ गोपाळांच्या दिंडीला सुरवात झाली. गावामधे दिंडीतील पालखीची नागरिकांनी पूजा केली व घरोघरी स्वागत केले. दिंडी गावातील प्रमुख मार्गावरून निघून गावातील बिल्डर उद्योगपती श्री आदिनाथ दळवे.श्री गोपाळ दळवे यांच्या निवासस्थानी असलेल्या




विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या ठिकाणी पोहचली. आणि त्याठिकाणी विसावा घेण्यात आला.यावी दळवे कुटुंबानी त्यांच्या निवासस्थानी पालखीचे पूजन केले व सर्व वारकऱ्यांना चहापाणी व वडापावची सोय केली.दिंडीमध्ये शिक्षक पालक विद्यार्थी यांनी फुगडी चा फेर धरून कार्यक्रमात उत्साह निर्माण केला.दिंडी यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री सूर्यकांत पाटील सर. शिक्षिका सौ.कस्तुरे मॅडम .श्री शिरीष पाटील सर. श्री आबा कोष्टी सर.श्री रामेश्र्वर देडे सर. श्री कैलास राठोड सर श्री खुतबोद्दिन शेख सर श्री पवार सर श्री नाईक नवरे सर सर्वांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले...



# मराठी शाळा दुधनी येथे शाळा व्यवस्थापन समिती बैठक

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

दुधनी/प्रतिनीधीः जि.प.प्रा .मराठी शाळा दुधनी येथे बैठक संपन्न झाली प्रथम अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री विश्र्वनाथ कोटनूर यांनी पुष्पहार अर्पण करून व्यवस्थापन समिती कडून अभिवादन करण्यात आले

यावेळी नवीनच जिल्हा अंतर्गत बदली होऊन आलेल्या श्री पोमू राठोड,अंजली गुंजोटी,शोभा म्हेत्रे यांचे शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आले यावेळी पोमू राठोड बोलताना म्हणाले की, कोणतेही कार्य करताना आनंदी होण्यासाठी नाही तर आनंदी होऊन करणे हाच धर्म आहे, स्मार्ट शाळेसोबत विद्यार्थीही स्मार्ट करू अशी ग्वाही दिली.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोरखनाथ दोडमनी, विश्र्वनाथ कोटनूर, मिहिदीमिया जिडगे, केंद्रीय मुख्याध्यापक श्रीशैल मलगण, विजयकुमार कोरचगाव, संजीवकुमार बेण्णेसूर अनेक शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते

# अणणाभाऊचे साहित्य म्हणजे शोषणमुक्तीचा जाहीरनामा : डॉ.प्रेम हनवते

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधीः संपूर्ण पृथ्वी वंचिताच्या तळहातावर तरली असल्यामुळे पृथ्वीचा सातबारा शोषितांच्या नावे करणारा पहिला विचारवंत साहित्यिक म्हणजे अण्णाभाऊ साठे होय.अण्णाभाऊंचे संपूर्ण लिखाण शोषकांच्या विरोधात बंड करणारे आहे. दलित पीडित , कष्टकरी , शेतकरी, शेतमजुर हमाल यांच्या शोषणमुक्तीचा जाहिरनामा म्हणजे अण्णाभाऊचे साहित्य असल्याचे मत डॉ प्रेम हनवते, प्रकल्प व्यवस्थापक तथा ईतिहास संशोधक बार्टी यांनी व्यक्त केले.



डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी) पुणे येथे दिनांक १८ जुलै २०२४ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस अप्पर जिल्हाधिकारी तथा विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना डॉ हनवते म्हणाले की, अण्णाभाऊंनी आपली प्रसिद्ध कादंबरी कुण्या बुवा बाबा साधुसंत किंवा राजकीय चळवळीतील कोणत्याही नेत्यास अर्पण न करता गुलामगिरीच्या बेड्या तोडणाऱ्या मानव मुक्तीचा उदघोष करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीस अर्पण केले आहे. कारण जग बदलण्याची ताकद फक्त आंबेडकरी विचारातच आहे हे ओळखून अण्णाभाऊंनी निर्वाणीचा इशारा केला की जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमरावआंबेडकरी विचाराचा अंगीकार करूनच आपली प्रगती होऊ शकते . या मार्गाने जाणे हीच अणाभाऊना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन डॉ प्रेम हनवते यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यानातून व्यक्त केले.

डॉ संभाजी बिराजे - सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक तथा ईतिहास संशोधक यांनी अण्णाभाऊंच्या स्मृतीस उजाळा देताना म्हणाले की, अण्णाभाऊना व्यवस्था परिवर्तनाचा ध्यास होता नव्हे,ते त्यांच्या जीवनाचे साध्यच होते. त्यांनी पिढीजात काव्यात बदल केला.कांदबरीचे स्वरूप बदलुन ते कांतीप्रवण बनविले.आपल्या समोर त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श समोर ठेवून साहित्याची निर्मिती केली.हेच त्यांचे दलित चळवळीला मिळालेले पहिले योगदान असल्याचे मत डॉ बिराजे यांनी व्यक्त केले.

यावेळी प्रकल्प व्यवस्थापक नितीन सहारे, सुमेध थोरात यांनी अण्णाभाऊंच्या स्मृतीस उजाळा दिला. याप्रसंगी वाटेगावचे विलास साठे यांना निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेची प्रत भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, संजय कदम, लेखाधिकारी योगिता झानपुरे,यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.सुत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले.आभार श्रीमती वैशाली खांडेकर यांनी मानले.

# नागणसुर जि.प.कन्नड मुले-मुली शाळेत आषाढी एकादशी निमित्त बाल वारकरी ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधीः बोला पुंडलिक वरदे हारी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम पंढरीनाथ महाराज की जय, या जयघोषात जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुले - मुलींची शाळा नागणसूर व बंधु नगर, हिप्परगी वस्ती, नागलगांव वस्ती, इंदिरा नगर कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांना विविध संतांच्या वेशभूषेत श्री विठ्ठल रुक्मिणी वेषात बाल गोपाळांची आषाढी एकादशीच्या निमित्ताने बाल वारकरी संप्रदाय पालखी, ग्रंथ दिंडी वृक्ष दिंडी उत्साहपूर्ण वातावरण संपन्न झाले.



प्रारंभी बाल वारकरी पालखी दिंडीचे पुजन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, बसनिंगय्या स्थावरमठ, गंगाधर भासगी, ग्राम पंचायत सदस्य ओंकार गंगोंडा, शरणप्पा मणुरे, बसवराज तेग्गीनकेरी, पावाडय्या नंदीकोल, विजयकुमार पोतदार, तिप्पण्णा माड्याळ, सौ गुरुबाई प्रचंडे, केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव, मुलींची शाळेचे मुख्याध्यापक श्रीशैल दोडमनी यांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून शुभारंभ करण्यात आले.सर्व बका वारकरी आनंदात विविध अभंग, टाळ, मृदंग, वीणा, चिपळ्या वाजवत, विठ्ठल विठ्ठल विठ्ठल हरी ओंम विठ्ठल, विठ्ठल नामाची शाळा भरली, माऊली माऊली, म्हणत नागणसूर गावातील प्रमुख पालखी दिंडी मार्गावर प्रदक्षिणा घालून गोल रिंगण सोहळा पार पडले.

दिंडी यशस्वी करण्यासाठी कल्लय्या गाणाचारी ,शरणप्पा फुलारी, शिवशरण म्हेत्रे, खाजप्पा किणगी, बसवराज स्वामी , राजशेखर कुर्ले, लक्ष्मीकांत तळवार, शांताबाई तोळणुरे, विजयश्री एंटमन, चन्नम्मा बिरादार, अंगणवाडी सेविका, मदतनीस, बाल वारकरी संप्रदाय, बालचमु उपस्थित होते. पालखी दिंडी नागणसूर गावातील प्रमुख मार्गावरून जात असताना ठिक ठिकाणी माता भगिनी यांनी दिंडीचे पाणी घालून पूजन करून औक्षण स्वागत करत होते. म्हणजे आपल्याला गर्दीत पंढरपूरचे वारी करता आला नाही, तरी प्रत्यक्षात पंढरीनाथ आमच्या घरी आले आहे. हे भावना प्रत्येकाचा मनात निर्माण झाले होते. गावातील नागरिक माता भगिनी यांनी या बाल वारकरी संप्रदाय पालखी सोहळा पाहून आनंदित होवून तल्लीन होऊन नाचत होते. शेवटी ग्राम पंचायत जवळ आल्यावर जिल्हा परिषद मराठी शाळेतील मुख्याध्यापक राजशेखर करपे, तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष बसवराज खिलारी, शिक्षक विश्र्वनाथ देवरमनी, आणि विद्यार्थी पालखी दिंडीचे दर्शन घेऊन स्वतः वारकरी सोबत दिंडीत सहभागी झाले. भक्तीत रममाण होऊन नाचून फुगडी खेळले.

या वारीच्या सुव्यवस्थेचा काम सर्व नागणसूर येथील कन्नड मुलांची मुलींची शाळा, बंधू नगर, नागलगांव, हिप्परगी वस्ती, इंदिरा नगर कन्नड शाळा येथील सर्व शिक्षक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सर्व सदस्य यांच्या अनमोल सहकार्य मिळाले आहे. शेवटी नागणसूर केंद्र शाळेचे वतीने मुख्याध्यापक विद्याधर गुरव सर यांनी सर्वांचे आभार मानले.

# पश्चिम महाराष्ट्रातील मराठा रॅलीची सोलापुरातून होणार सुरुवात ; तारीख फिक्स..!

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभा निवडणूक निकालाच्या नंतर संपूर्ण राज्यामध्ये मनोज जरांगे पाटील फॅक्टरची जोरदार चर्चा झाली. निकालानंतर जरांगे पाटील यांनी मराठा जागृती शांतता रॅलीची सुरुवात केली आणि त्यास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. पहिल्या टप्प्यातील रॅली संपलेली असून पश्र्चिम महाराष्ट्रातील मराठा रॅलीची सुरुवात सोलापुरातून होणार असल्याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी आज अंतरवाली सराटीतून दिली.



सात ऑगस्ट पासून पश्र्चिम महाराष्ट्रातील रॅलीची सुरुवात होणार असून त्याच दिवशी सोलापुरामध्ये भव्य स्वरूपात मराठ्यांचे वादळ धडकेल अशी प्रतिक्रिया देण्यात आली आहे.आज गुरुवारी अंतरवाली सराटीमध्ये सोलापूर, सांगली, कोल्हापूर सातारा, अहमदनगर ,पुणे, नाशिक जिल्ह्यांमध्ये मराठा जागृती शांतता रॅली येणार आहे.आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर संपूर्ण राज्याचे लक्ष जरांगे पाटलांच्या रॅलीकडे लागून राहिले आहे. आज गुरुवारी पाटील यांच्या उपस्थितीत सात जिल्ह्याचे मराठा समन्वयक, आमरण उपोषणकर्ते, साखळी उपोषणकर्ते,मराठा सेवक यांची नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. सोलापूरमध्ये ७ ऑगस्ट रोजी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील येत असून या दौऱ्याची संपूर्ण तयारी नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात येईल. सर्व अकरा तालुक्यांच्या समाज बांधवांना याची माहिती देण्यात येणार आहे. या शांतता रॅलीत सर्व जाती-धर्माचे समाज बांधव एकत्रित येणार असून सामाजिक सलोखा राखण्याचे काम मराठा समाज करेल. छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य सभेचे नियोजन करण्यात येणार आहे.

# कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूलमध्ये दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

कळंब/सुधाकर रणदिवेः कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूल तांदुळवाडी, कळंब येथे दिनांक १७ जुलै २०२४ रोजी आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला, कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूल तांदळवाडी, कळंब, जिल्हा धाराशिव, येथे आषाढी एकादशी निमित्त वारकरी दिंडी सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली,



याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रवी नरहिरे, सौ.आशा नरहिरे तसेच मुख्याध्यापक संतोष आळंदकर व उप मुख्याध्यापक विवेक अष्टेकर उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नजमुन अजमेर शेख व त्यांचा परिवार उपस्थित होता. गेल्या वीस वर्षापासून खेर्डा ता. कळंब या गावी नजमून शेख या आषाढी दिंडीसाठी अन्नदान करत असून खेर्डा या गावांमध्ये सप्ताह बसवण्याची देखील प्रथम त्यांनी केली आहे. या सप्ताहात त्यांची पहिली पंगत असते तसेच त्या अंगणवाडीच्या अशा कार्यकर्ते असून एसबीआय च्या विमा एजंट म्हणून देखील काम करतात सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय असल्यामुळे शाळेतर्फे त्यांच्या येतो चित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेमध्ये चिमुकल्यांची वारी दिंडी काढण्यात आली. सिनियर केजी, ज्युनिअर केजी, पहिली तसेच इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायावर आधारित भारदार नृत्य सादर करून संस्कृतीची जोपासना केली.याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.अर्चना बावीकर यांनी तर आभार प्रदर्शन उप मुख्याध्यापक विवेक अष्टेकर यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष रवी नरहिरे व सौ. अशा नरहिरे यांनी या बालकलाकारांच्या आनंदात स्वतः सहभागी होऊन दिंडी सोहळ्याचा आनंद द्विगुणित केली.



# मनपा डिजिटल स्कूल २८ नंबर मध्ये आनंदवारी उत्साहात साजरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर येथील मनपा डिजिटल स्कूल २८ नंबर सुंदरम नगर येथे बाल चिमुकल्यांच्या विठ्ठल रखुमाई संत तुकाराम संत वासुदेव ज्ञानेश्र्वर जनाबाई वेशभूषा दिंडीचे आकर्षण ठरले विठ्ठलाचा गजर करत स्वामी समर्थ देवळाकडे रवाना झाले या दिंडीतून साक्षात विठ्ठलाचे दर्शन होत होते बाल चिमुकल्यांची दिंडी पाहण्यासाठी परिसरातील नागरिक पालक श्री स्वामी समर्थ मंदिरामध्ये महिलांनी शिक्षकांनी फुगडी खेळत होते ही दिंडी यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक स्वतः सर व त्यांची सर्व शिक्षक वर्ग व माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गळोरगीत रक्तदानाने मोहरम साजरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट



तालुक्यातील मौजे गळोरगी येथे सामाजिक बांधिलकी जपत हिंदु मुस्लिम ऐक्याचे प्रतिक असलेला मोहरम सण रक्तदानाचा अभिनव उपक्रम राबवत उत्साहाने साजरा करण्यात आला. श्री रेवणसिध्देश्र्वर युवा मंच, मोहरम पंच कमिटी व गळोरगी ग्रामस्थ आणि श्री महात्मा बसवेश्र्वर रक्त पेढी सोलापुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिरात २७ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उदघाटन प्रगतील शेतकरी श्री लक्ष्मण आजुरे यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी श्री खाजाभाई नदाफ हे होते.मकर संक्रांत , गुढी पाडवा व मोहरम निमित्त प्रत्येक वर्षी श्री रेवणसिध्देश्र्वर युवा मंच व गळोरगी ग्रामस्थांमार्फत सलग मागील वीस वर्षापासुन रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे. आता पर्यंत एकुण ३०-३५ वेळा रक्तदान शिबिराचे आयोजन करत संपुर्ण सोलापुर जिल्हयात व अक्कलकोट तालुक्यात गळोरगी हे छोटेसे गाव पर्थम क्रमांकाचे एक आदर्श गाव ठरले आहे.प्रत्येक रक्तदात्याला २० लिटर्स क्षमतेचे पाण्याचे जार युवा मंच मार्फत देण्यात आले व अल्पोपहाराची सोय करण्यात आली.शिबिरासाठी माजी ग्रामपंचायत सदस्य श्री मल्लप्पा झग्गे, श्री पंडीत प्रचंडे, श्री सिद्रामप्पा बिराजदार, श्री नागप्पा बिराजदार, श्री बाबुराव व्हनकोळ, माजी ग्रामपंचायत सदस्य श्रा चंद्रकांत पाटील,ड्खउ चउ्ठढ मेंबर श्री शिवानंद बिराजदार,श्री चंद्रशेखर जमादार, श्री सिध्दाराम जकापुरे, श्री सिध्दप्पा झग्गे,श्री संतोष बणजगोळ, श्री बसवराज संजवाड व गळोरगी ग्रामस्थ उपस्थित होते.प्रास्ताविक सुत्रसंचालन दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक श्री वहिदपाशा शेख तर आभार गळोरगी कॉंग्रेस आय अध्यक्ष श्री बाळासाहेब पाटील यांनी मानले.रक्तदान जनजागृती मार्गदर्शन माहीती माजी सैनिक श्री बसवराज पाटील यांनी दिली.शिबिर यशस्वी करण्यासाठी श्री चंद्रकांत निरोणे,श्री रामेश्र्वर बिराजदार,श्री शरण बिराजदार, श्री प्रकाश मैंदर्गी, वे ईरय्या स्वामी,श्री सातलिंग आजुरे, श्री चन्नप्पा निरोणे,श्री संतोष अंदोडगी,मा तंटामुक्त अध्यक्ष श्री सिध्दाराम बिराजदार,श्री शिवराज बिराजदार ,श्री दमनु जमादार, श्री भिमाशंकर पुजारी,श्री चंद्रकांत माशाळे,श्री लक्ष्मण बाके,श्री संजय निंबाळे, श्री शिवराज भासगी,श्री मनोज जामनीकर , श्री सिकंदर शेख व गळोरगी ग्रामस्थांनी परीश्रम घेतले.

# आषाढी एकादशी निमित्त श्री हनुमंत मोरे मित्र मंडळ यांच्या वतीने भोसे येते भाविकांना फराळ वाटप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःआषाढी एकादशी निमित्त श्री हनुमंत मोरे मित्र मंडळाच्या वतीने हनुमंत मोरे यांच्या शुभहस्ते पंढरपूर तालुक्यातील भोसे पाटी येथे भाविकांना फराळ वाटप करण्यात आले.यावेळी पंढरपूरला जाण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती तालुका पंढरपूर येथे बोरसे पाटी येथे भोसे गावातील प्रगतशील बागायतदार व शेतकरी यावेळी उपस्थित होते.यावेळी हनुमंत मोरे. रामदास माळी. हरिचंद्र तळेकर. नारायण कोरके अनिल बोराडे दिलीप कोरके सौदागर जाधव अशोक अवताडे तानाजी जमदाडे प्रवीण जमदाडे सुनील गोसावी हनुमंत नाईक नवरे दत्तात्रय काशीद इत्यादी गावातील मान्यवर उपस्थित होते



# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना राष्ट्रवादीच्या वतीने अभिवादन...

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सामाजिक अन्याय विरुद्ध लढा देत. साहित्याच्या आणि लोकशाहीच्या माध्यमातून शोषित आणि वंचितांच्या हक्कासाठी आवाज उठवला तळागाळातील लोकांना जगण्याची दिशा त्यांच्यामुळे मिळाली

त्यांच्या कार्याचा आदरणीय स्मरण सदैव आपल्या हृदयात जागृत राहील त्यांच्या पुण्यतिथी निमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने त्यांना पूर्णपणे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले सेवालाल अध्यक्ष प्रकाश जाधव महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोवन नगर आनंद मुस्तरी वाहतूक विभाग अध्यक्ष इरफान शेख दशरथ शेंडगे राजाभाऊ मिळून वरी सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभव गंगणे काराध्यक्ष सोमनाथ शिंदे सांस्कृतिक विभाग अध्यक्ष आशुतोष नाटककार अल्पसंख्याक कार्याध्यक्ष संजीव मोरे ओबीसी अध्यक्ष अनिल छत्रपती पदाधिकारी उपस्थित होते